



# लोकांना गणिताचा, तर मला पोहण्याचा धसका

## जयंत नारळीकर

१९४०-५० च्या दशकात माझे वय सहापट झाले ! हा गणिताचा पेपर असता तर विचारले असते 'माझे जन्म वर्ष कोणते ?' इथे हे सांगण्याचा हेतू एवढाच की लहान वयात नव्या अनुभवांची भर झपाट्याने पडत असते. काही अगदी लहानपणचे अनुभव पुढे विस्मृतीच्या गर्तेत लुप्त होतात, तर काही ठळकपणे लक्षात राहतात. असे काही ठळक अनुभव उन्हाळ्याच्या सुट्टीतले खाली देत आहे.

**रम्य आठवणी आजही ताज्या**

माझे बालपण बनारसमध्ये गेले. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीतल्या प्रशस्त आणि शांत आवारात एका प्रशस्त बंगल्यात. बनारसचा उन्हाळा प्रचंड... इतका की सकाळी दहा ते संध्याकाळी पाचपर्यंत घराबाहेर पडणे म्हणजे शिक्षाच. त्यामुळे शाळा संपली तरी सुट्टीत स्वैर भटकणे आणि खेळणे याला आपोआप मर्यादा पडे. बाहेरच्या दारं-खिडक्यांना वाळ्याचे पडदे बसवून त्यावर सतत पाण्याचा मारा करून आतील तपमान आटोक्यात ठेवण्याचा आटापिटा असे. घरातील 'सीलिंग फॅन' असलेल्या एकमेव खोलीत आम्ही ठाणे देत असू. तेथेच कॅरम, बुद्धिबळ, बॅगॅटेल आणि पत्त्यांचे डाव चालत. रात्री तेथेच फरशीवर गाद्या टाकून त्यावर गार पाणी शिंपडून झोपायचे... किंवा बाहेर अंगणात पलंग टाकून ! बाहेर झोपलो असताना पहाटे कोकिळेच्या आवाजाने आणि शीतल वाऱ्याच्या झुळकेने जाग आल्याच्या रम्य आठवणी अजून ताज्या आहेत.




*बनारसच्याजवळ बुद्धकालीन अवशेष पहायला सारनाथच्या ट्रिपवर लेखक आणि सई परांजपे.*

उन्हाळा म्हटला की आंबे आलेच दुदोट्या चोखून खायच्या आंब्यांची मुबलक झाडे विद्यापीठात होती. दर उन्हाळ्यात ती एखाद्या ठेकेदाराला देण्यात येत. त्याने आंबे काढून विकावेत आणि ठराविक भाडे विद्यापीठाला द्यावे. तीन-चार रुपये शेकडा भावाने हे आंबे विकले जात आणि शेकड्यांनी खाल्लेही जात. पण 'बनारसी लंगडा' हा तिथल्या आंब्यांचा राजा. त्यातून इंपीरियल बँकेच्या बगीच्यातल्या लंगड्यापुढे इतर लंगडे लंगडे पडत.

**लंगडा हापूसच्यावर**

ज्याने उत्कृष्ट लंगडा खाल्ला नाही तो हापूसला सर्वश्रेष्ठ मानेल यात नवल नाही. ह्या दोन आम्रश्रेष्ठांत श्रेष्ठ कोण याबद्दल माझे वाद महाराष्ट्रातून आलेल्या पाहुण्यांशी होत आणि अजूनही महाराष्ट्रात वास्तव्य केल्यावर

(पान पाचवर)



*सुट्टीत टायपिंगचा सराव*

# आजही आनंद देणारे सुट्टीतले ते अनुभव !

(पान तीनवरून)

होत असतात. आज माझे गणिती मत असे : सरासरी घेतली तर हापूस लंगड्याहून भारी ठरेल, पण सर्वोत्कृष्ट जातीच्या लंगड्याची सर सर्वोत्कृष्ट हापूसला येणार नाही.

बनारसच्या उन्हाळ्यात सुट्टी घालवण्यापेक्षा मे-जूनमध्ये मुंबई-कोल्हापूरकडे जाण्याची आम्हांला ओढ असे. पण ते प्रत्येक सुट्टीत जमले नाही. दर वर्षापासून, दोन वर्षांतून एकदा आणि पुढे चार वर्षांतून एकदा... अशी कोल्हापूरची यात्रा 'दुर्मिळ' होत गेली.

कोल्हापूरला आमचे काका-मामा दोन्ही होते, त्यामुळे मी आणि माझा धाकटा भाऊ तेथे जाण्यास नेहमी उत्सुक असू. आजच्या काळात भर उन्हाळ्यात गर्दीला तोंड देत प्रवास करणे नकोसे वाटते, नाहीतर लहानपणापासून मला आगगाडीच्या प्रवासाचे आकर्षण वाटत आले आहे.

त्याकाळी बनारसहून मुंबईमार्गे कोल्हापूरला जाताना प्रवासाचा पहिला टप्पा म्हणजे भाड्याच्या टॅक्सीने मोगलसराई स्टेशन गाठणे, तेथून सकाळी आठच्या सुमारास जाणारी 'बॉम्बे मेल' पकडण्यासाठी. पहाटे उठून आदल्या दिवशी बांधाबांध केलेले सामान टॅक्सीत खालीवर मागेपुढे भरून जाताना मनात आगळाच उत्साह वाटे. सुट्टीची सुरुवात, प्रवासाची सुरुवात आणि सकाळचा ताजेपणा ह्यामुळे बॉम्बे मेलच्या माझ्या आठवणी सुखद आहेत. त्यातून इगतपुरीनंतर येणारे बोगदे, विजेवर चालणारी इंजिने आणि बिनइंजिनाच्या लोकलगाड्या प्रवासाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी, दुपारी पहायला मिळत. त्याउलट परत येतानाच्या कलकत्ता मेलच्या आठवणी कंटाळवाण्या ! ही गाडी रात्री व्ही. टी.हून सुटे आणि अठ्ठावीस तासांनी मध्यरात्री मोगलसराईला पोचे. अर्धवट झोपेत, प्रवास संपला, सुट्टीपण संपत आली अशा उदासवाण्या जाणिवेत घरी पोचू.

कोल्हापूरच्या प्रवासात मुंबईचा टप्पा हे प्रमुख आकर्षण. ट्रॅम, बस, लोकल आणि टॅक्सी सर्वच आम्हा बनारसीभय्यांना नवीन. चौपाटी, राणीचा बाग, मेट्रोतील सिनेमा, मलबार हिल आणि हँगिंग गार्डन.... ही त्याकाळची आकर्षणे आज नकोशी वाटतात. जीवाची मुंबई आज जीवघेणी मुंबई झाली आहे. त्या चार दशकांत मुंबई बदलली का माझे बालपण हरवल्याचा हा परिणाम आहे ?

**ते स्टेशनही हरवले !**

अशाच एका प्रवासात एकदा माझ्या वडिलांच्या एका मित्रांनी आपल्या उघड्या मोटारीतून आम्हांला मुंबईत खूप फिरवले. पश्चिम उपनगरांच्या दिशेने गेलो असताना एका स्टेशनाजवळ गाडी थांबवून आम्ही एका बाकावर बसलो आणि जाणाऱ्या – येणाऱ्या बी. बी. सी. आय. गाड्यांची मजा पहात वेळ घालवला. रस्त्यावर रहदारी जवळजवळ नव्हतीच. स्टेशनही मोकळेच. वातावरण शांत, गप्पा मारत बसण्याजोगे. १९७२-८९ च्या मुंबईतल्या वास्तव्यात मी ते स्टेशन कुठले असावे ते शोधण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मला वाटते माझे बालपण हरवले तसे ते स्टेशनही हरवले.

कोल्हापूरला आम्ही दोघे आईबरोबर आजोळी मामा-मावश्यांच्या सान्निध्यात असू. वडील महाद्वारमधील त्यांच्या घरी असत. मधूनमधून आम्ही काका-काकीकडे जाऊन येत असू. पण आजोळी हुजूरबाजार वाड्यात स्वैरपणे बागडण्याचे सुख इतर कुठे लाभले नाही. समवयस्कांबरोबर हिंडण्या-फिरण्यात, सिनेमे पाहण्यात (डॉ. कोटणीस की अमर कहानी आणि बॉब होपचा द प्रिंसेस अँड द पायरेट हे सिनेमे तीन तीन वेळा पाहिले), आंबोळ्या खाण्यात (– आज कोल्हापुरात आंबोळी मिळते का ?) दीड महिना कसा निघून जाई ते कळत नसे.

**एक सुटी पोहणे शिकण्यात**

एका सुट्टीत मात्र आईने आम्ही दोघांनी पोहायला शिकावे असा फतवा काढला आणि आमच्या दुर्दैवाने एक मामा आणि त्यांचे एक मित्र शिकवायला उत्साहाने तयार झाले. 'दुर्दैवाने'... कारण आमच्या सुट्टीतील मुक्त जीवनावर काही निर्बंध लागले ! सकाळी लवकर उठून दीड दोन मैल चालत जाऊन पंचगंगेतल्या गार पाण्यात उतरावे लागले. काही लोक गणिताला नाहक भितात तसा मी पोहण्याला नाहक भितो. त्यामुळे माझी पोहण्याची प्रगती यथातथाच होती. मामा मात्र उत्साहाने सांगत... आता रुपयात चार आणे प्रगती झाली.... आता आठ आणे, उद्या दहा आण्यापर्यंत जाऊ. पण चवदा आण्यापर्यंत गेल्यावर आम्हां दोघांना सर्दीखोकला झाला. तो जाईपर्यंत पोहणे शिकण्यावर बंदी असावी हा आमचा (आई आणि मामांना बायपास करून) केलेला अर्ज वडिलांनी मान्य केला. सुट्टी संपेपर्यंत खोकला जाणार नाही अशी आमची आशा मात्र निष्फळ ठरली. उरलेल्या आठवड्यात मामांनी परत हाती धरले आणि चवदा आण्यातून सोळा आण्याकडे नेले... आणि मग सुट्टी संपली.

अर्धवट झोपेत पहाटे तीनपर्यंत पाहिलेले संगीत मानापमान पॅलेस थिएटरमध्ये पाहिल्याचे स्मरते. त्याच प्रयोगाचे (किंवा दुसऱ्या कुठल्या तरी ते आठवत नाही) रिहर्सल पहायला आम्ही काही मुले एका सकाळी गेलो होतो. तेथे एकाने बोट दाखवून सांगितले 'ते पहा बालगंधर्व'.

आजकालच्या ट्रॅव्हल लाइटच्या जमान्यात आमची कोल्हापूर यात्रा म्हणजे मोठे अभियान होते. पाच-सहा ट्रंका, चार होल्डऑल, चार-पाच छोट्या बॅगा वा पिशव्या, पाण्यासाठी मातीच्या दोन सुरया... इतके सारे सामान घेऊन रिझर्वेशन शिवाय दुसऱ्या वर्गाने जाणे शक्य होते आणि तो दुसरा वर्ग चिं. वि. जोशी यांच्या चिमणराव वाङ्मयातल्यासारखा असे. गाड्यांचे त्या वेळचे वेळापत्रक आजच्याशी तुलना करून पाहिले तर फारसा फरक दिसत नाही. याचा अर्थ आजच्या विज्ञानयुगाची चाहूल अजून आपल्या आगगाड्यांपर्यंत पोचलेली दिसत नाही. वासरांत लंगड्या गाईप्रमाणे सुपरफास्ट गाड्या सुपरभाडे आकारून मिरवतात इतकेच !

**तो दुवा आजही कायम**

सुटीतला एक महत्त्वाचा भाग शेवटी राखून ठेवला आहे, तो म्हणजे गोष्टी ऐकण्याचा आणि वाचनाचा. इंग्रजी, मराठी व हिंदी कथा-कादंबऱ्यांचा आणि विनोदी वाङ्मयाचा साक्षात्कार आम्हाला ह्या दोन्ही मार्गांनी बनारसच्या उन्हाळ्यात विशेष झाला. मराठी पुस्तके, चंदू-गोट्या-वसंतचे बाल-वाङ्मय, नाथमाधव आणि हरी नारायण आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या आम्हांला मुंबई-कोल्हापूरच्या प्रवासात किंवा बनारसलाच विद्यापीठाच्या वाचनालयात मिळत असत.

तो वाचनाचा दुवा आजही कायम आहे.